# अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरवाद

**प्रा. डॉ. कह्याळेकर सी. एम.**
लोकप्रशासन विभाग व संशोधन मार्गदर्शक
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड, जि. नांदेड.

**प्रस्तावना:-**

अण्णाभाऊंचा जन्मच भारतीय संस्कृतीने लादलेल्या दु:खी, अन्याय, अत्याचार, दारिद्रय इत्यादी मानवतेची अवहेलना अशा मानवविनाशी व्यथांच्या पोटी जन्म झाला. ज्या कुटुंबात अण्णाभाऊचा जन्म झाला.तो समाज वरील विचारात घेतलेल्या मूल्यांशी आपली इमान राखून जीवन जगात होती.यांची जाणीव अण्णाभाऊ साठे यांना होती शिक्षण घेण्यासाठी आलेले अपयश लहान वयापासून त्यांनी जगण्यासाठी दिलेली झुंज परिस्तिथीमुळे बालवयातच कष्ट उपसण्याचे किंवा करण्यासाठी पाठीशी लागलेले दुष्ठचक्र या या फेऱ्यात त्यांच्या बालपणाची झालेली अवहेलना काबाड कष्ट करण्याशिवाय दुसरे कोणतेही पर्याय नव्हते.त्यामुळे त्यांना या मानवी जाणीवेचा व संवेदनशील कथारूपी स्मृतिकोश तयार करून त्यावर दलितांच्या व्यथांची,वास्तव कथा आपल्या समग्रकथा वाङ:मयात मांडण्यात आहे.

अण्णाभाऊ साठे हे एक कथाकार,कादंबरीकार,नाटककार, शाहीर आणि कलाकार अशा विविधाअंगी अण्णाभाऊची अख्या जगाला ओळख असली तरी अण्णाभाऊ हे मात्र हाडाचे कलाकारच म्हणून मानावे लागेल. संवाद, विषय मांडणी आशय अशा सर्वच बाबतीत त्याचे विचार त्यांनी वेगवेगळया विचाराने मांडलेल्या कथा,कादंबरी,आणि इतर साहित्य हे समृद्ध व संपन्न आहे. असे म्हंटल्यास चूक ठरू नये. ‘अण्णाभाऊनी मानवी मूल्यांनी लिहिलेल्या सर्वच साहित्य मराठी, हिंदी, सिंधी, बंगाली, मल्याळी,जर्मन झेक, इंग्लिश, पोलिश, रशियन,अशा देशात आणि परदेशात साहित्य विविध भाषांतही प्रकाशित झाले म्हणजेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अण्णाभाऊचे साहित्य पोहचलेले आहेत’.१ ( मनीषा पाटील,अमोल महापूरे,कृष्णा आगे,संपादक,सत्यशोधक अण्णाभाऊ साठे बहुजन कैवारी,शौर्य प्रकाशन,लातूर-१.आक्टोंबर-२०१८ पृष्ठ क्र.२४०)

अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक,आर्थिक,व राजकीय विचारावर लिहायचं झाल्यास असे म्हणता येते की,अण्णाभाऊ हे समाजासाठीच हे सर्व निर्माण केले आहेत.महाराष्ट्रातील समाज परिवर्तनाचे वादळ निर्माण करणारे महामानव अण्णाभाऊ साठे यांचा जन्म महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या छोट्याशा खेड्यात या रत्नाचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी झाला. अण्णाभाऊनी कामगारासाठी,समाजातील व समाजाबाहेरील सर्वच उपेक्षितांसाठी लढा दिला आहे.

**अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरवाद.**

**विषयाचा उद्देश :**

प्रस्तुत शोध निबंधाचा उद्देश आहे की, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील सामाजिक,आर्थिक,राजकीय,सांस्कृतिक अशा विचाराचा अभ्यास करणे आणि अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे प्रभाव किंवा आंबेडकरवाद या विषय परिवर्तनात्मक मांडणी करणे आणि समजून घेणे हा उद्देश आहे.

**शोध निबंधाचा कालखंड :**

प्रस्तुत शोध निबंधाचा कालखंड हा अण्णाभाऊ साठे यांच्या विचार कालखंडापुरता मर्यादित आहे. किंवा १ ऑगस्ट १९२० ते १८ जुलै १९६९ पासून आजपर्यंत संदर्भ आधारीत असा राहील.

**संशोधन पद्धती :**

सदरील शोध निबंध लिहण्यासाठी ऐतिहासिक,प्रचलित व चालू सद्यस्थितीतील सर्वच शोध निबंधासी निगडीत साहित्य लेख, शोध निबंध, पुस्तके, संदर्भग्रंथ, नियतकालिका, वर्तमानपत्रे, इत्यादी वर्णनात्मक आणि संदर्भीय साहित्य पद्धतीचा अवलंब केला आहे.

**अण्णाभाऊंची सामाजिक तळमळ आणि वाङ्:मय विचार :-**

मराठी साहित्याच्या अथांग सागरामध्ये अस्सल लोकभाषिक शैलीचे स्वतंत्र भांडार तयार करून मराठमोळ्या साहित्याची निर्मिती ही अण्णाभाऊची महान कामगिरी होय. “८१ वर्षाच्या पूर्वी मराठी साहित्यात अण्णाभाऊना रंजनवादी,दैववादी,बोधवादी,नितीवादी,किंवा जीवनवादी अशा वेगवेगळ्या नावाने ओळखले जात असत अण्णाभाऊ राष्ट्रीय लढ्याच्या चळवळीशी, साम्यवादी चळवळीशी लेखनाच्या माध्यमातून जोडले गेले आणि चळवळीतील अफाट सागरात गुंतलेला लढाऊ माणूस त्यांच्या लेखनाचा विषय बनला. सर्व सामान्य माणसे मग ती कष्टकरी जनता असो किंवा ग्रामीण भागातील गरीब शेतकरी असो. अण्णाभाऊंनी आपल्या अवतीभोवती वावरणारा समाज स्वत:च्या लेखणीतून परीपुर्णतेने उभा करण्याचा प्रयत्न केलले आहेत.आणि समाजाच्या सुखदु:खाशी हित संबंधाशी स्वत:ची नाळ जोडून घेतली आहे.अण्णाभाऊंने सामान्य माणसांच्या सर्व गुणाचे,आचार विचाराचे, प्रेमाचे, अन्याया विरुद्धच्या बंडाचे दर्शन आपल्या साहित्यातून मांडणी केलेली आहे.”२( बजरंग कोरडे,भारतातील साहित्याचे निर्माते अण्णाभाऊ साठे, साहित्य अकादमी नवी दिल्ली,-२०१३ पृ.क्र.८१) अण्णाभाऊंना सामाजिक बांधिलकी मानणारा मानवतावादी लेखक,दलित साहित्याचे प्रवर्तक शब्दात्म्याची सार्थक इतिहास परंपरा शोधणारा कथाकार इत्यादी अशा बहुविचारी पदव्या बहाल केल्या जातात.म्हणून मराठी साहित्यातील अनेक मान्यवरांनी अण्णाभाऊंच्या लेखनशैलीला शिरसावंद्य मानून लिखाण केलेले आहेत. “प्रज्ञा,शील ,करुणा,विद्या व मैत्री या पंच तत्वानुसार प्रत्येकांने आपले चारित्र्य घडवत ज्ञानाला करुणेची व मैत्रीच्या

भावनेची जोड द्यावयास पाहिजे व सत्यशील होण्यासाठी नि:स्वार्थ न्यायप्रेमी,यातून व्यापक मनोवृत्ती केली पाहिजे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक तत्व अण्णाभाऊंनी स्वीकारले होते. म्हणूनच त्यांनी आपल्या चौफेर लिखाणातून सर्व उपेक्षित घटकांच्या उद्धाराचा कृतीशील विचार उभा केला आहे.त्यांना मानवी मनाच्या दु:खाचा समग्र वेध घेण्याची क्षमता व दूरदृष्टी लाभली."३( डॉ.नरसिंग पिराजी कुडकेकर,संशोधन पेपर, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरी विचार, संपादित ग्रंथ ,सत्यशोधक अण्णाभाऊ साठे बहुजन कैवारी,शौर्य प्रकाशन,लातूर-१.आक्टोंबर-२०१८ पृष्ठ क्र.१०१ ) म्हणून अण्णाभाऊ म्हणतात की, "पृथ्वी हि शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून ती कामगाराच्या तळहातावर तरलेली आहे". या विचारातून त्यांची दृष्टी आणि श्रमिकाविषयीचा आत्मविश्वास अण्णाभाऊंच्या विचारातून जाणवतो.

**अण्णाभाऊंच्या विचारातील आंबेडकरी वळण :-**

अण्णाभाऊची लिखित प्रचंड साहित्य निर्मितीचे कार्य सुरूच होते.त्यांच्या विचारात सतत रशियन क्रांती आणि मार्क्सवाद ठासून भरलेला होता. अण्णाभाऊ गरीब श्रमिकव कामगारांच्या जीवनात बदल व्हावा मांडून आपल्या कथा कादंबऱ्यातून जग बदलण्याचे सूत्र मांडत होते.अण्णाभाऊ मार्क्सवादी विचार भारतीय समाजव्यवस्थेत रुजवावा आणि मजुरांनी आपल्या देशात सुद्धा रशियासारखी क्रांती घडवून आणावी असे अण्णाभाऊना नेहमी वाटत असायचे आणि म्हणून अण्णाभाऊ तळागाळातील शेवटच्या माणसाचा विचार करू लागले होते. "जातीअंताचे दलितांच्या उत्थानाचे तीव्र आंदोलन या देशात १९२० फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरच राबवीत आहेत.हे अण्णाभाऊना माहित होते.अण्णाभाऊ कामगाराच्या चळवळीत १९४० पासून आले.आणि त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची आंदोलने जोरात सुरु होती."४(विजय मुरलीधर गावंडे,अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरी विचार संपादित ग्रंथ,सत्यशोधक अण्णाभाऊ साठे बहुजन कैवारी,शौर्य प्रकाशन,लातूर-१.आक्टोंबर-२०१८ पृष्ठ क्र.१६८) तेंव्हा अण्णाभाऊ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आंदोलनाकडे, त्यांच्या भांषणाकडे, त्यांच्या झुंजार लेखनीकडे अत्यंत आदराने पाहत होते.कारण या देशातला बहुसंख्य कामगार वर्ग हा दलित अस्पृश्य जातीतील होता. येथील व्यवस्थेत अत्यंत खालच्या दर्जाची, सेवेची आणि गुलामगिरीची कामे त्यांनाच बहाल केली गेली होती.त्यांच्या उत्थानासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे रात्र दिवस खटपटत होते झटत होते जीवाचे रान करीत होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे हे दलितोद्धाराचे आणि दलिताच्या कल्याणाचे कार्य अण्णाभाऊना कळून चुकले होते.अण्णाभाऊ बाबासाहेबाच्या कार्याने प्रभावित झाले होते.

**डॉ.बाबासाहेबांच्या मानवतावादी संघर्ष आणि झुंजार लेखनी संबंधी अण्णाभाऊंचे विचार:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादी संघर्ष आणि झुंजार लेखणीच्या घणाघाती प्रथेने समाजरचना खिळखिळी होत आहे. याची सुस्पष्ट कल्पना अण्णाभाऊंना आली होती.त्यामुळे अण्णाभाऊनी जेव्हा देशभक्त घोटाळे वगनाट्य लिहिले, तेव्हा त्यात वर्गातील महत्वाचे पात्र 'फडक्या'

यांच्या तोंडी एक गीत टाकले. “अण्णाभाऊ साठेनी देशभक्त घोटाळे हे वगनाट्य १९५७ ला लिहिले डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला १९५६ ला बौध धम्म दीक्षा देऊन तथागथित अस्पृश्य वर्गात क्रांती घडवून आणली होती.या अभूतपूर्व घटनेने अण्णाभाऊ साठे फारच प्रभावित झाले होते.तशी पावती अमरशेखांनी या वगनाट्याच्या पुस्तकाला प्रस्तावना देताना अवर्जून दिलेली आहे. धर्मांतराच्या घटनेने प्रभावित होऊनच अण्णाभाऊ साठे यांनी या वगनाट्यात फटक्या या नायकाच्या तोंडी जे गीत टाकले ते गीत खालीलप्रमाणे आहे.

**जग बदल घालूनी घाव सगुण गेले मज भीमराव**
**गुलामीच्यााया चिखलात रुतून बसला का ऐरावत**
**अंग झाडूनी निघ बाहेरी घे बिनिवरती घाव** ”५ (तत्रैव पृष्ठ क्र.१६९)

वरील प्रसंगानुसार विचार केल्यास अण्णाभाऊ साठे हे समाज सेवक आणि देश हित जोपसणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचे मनातून आदर करणारे अण्णाभाऊ हे खरे साहित्यिक होते आहे म्हटल्यास वावग ठरणार नाही अस म्हणेन.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर समस्त बहुजानाचे प्रेरणास्थान :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे या दरम्यान समस्त बहुजन वर्गाचे प्रेरणास्थान होते.कारण त्यांनी जेंव्हा **‘शिका,संघटीत व्हा आणि संघर्ष करा’** हा विकासाचा मूलमंत्र जनतेला दिला.तेंव्हा सामाजिक,राजकीय,वैचारिक व शैक्षणिक चळवळीला डॉ.बाबासाहेबाच्या नेतृत्वाने मोठी गती मिळाली.शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही या विचाराने प्रेरित होऊन संपूर्ण महाराष्ट्रातील महार मांग व इतर उपेक्षित जाती समूहामध्ये खूप मोठे वैचारिक परिवर्तन झाले व या समूहाची मुले शिक्षणाकडे वळली.यातून “अण्णाभाऊंनी आदर्श घेऊन साहित्याची निर्मिती केली, त्यातून जगाला आदर्श घालुन दिले. ‘थडग्यातील हाडं’ या कथेत भल्ल्या धनगराला सत्तर हजार रुपये खंडणी दिली नाही तर तारणगाव जळून खाक होणार होता. गावकऱ्यांनी सभेत भल्ल्या धनगराला खंडणी द्यायचे ठरवून टाकले होते. पण रायनाक महार हा नायक म्हणाला खंडणी का द्यायची, लढाई देऊ या.आम्ही पळणार नाय बेलभंडार उचलून जीव देऊ.शेवटी भल्ल्या धनगराशी टक्कर घेत घेत रायनाक महार कामास आला. हा विषय, व्यवहार लेखक समाजव्यवस्थेमध्ये बळी ठरलेल्या अशा कित्येक माणसाच्या व्यथित कथा अण्णाभाऊंनी चितारलेल्या आहेत.

या कथेत गावगाड्याच्या इभ्रतीसाठी झटणाऱ्या दलितांच्या इतिहासाचा कसा जाणीवपूर्वक विपर्यास करण्यात येतो याचा शोध मांडून इतिहास स्पष्ट केलेला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी एके ठिकाणी असे आव्हान केले होते कि,अस्पृश्याच्या इतिहासाची परंपरा शोधली पाहिजे. त्यांची ओळख कथा कादंबरीतून दलित वर्गाला करून दिली पाहिजे हे आव्हान अण्णाभाऊंनी स्वीकारले.आणि प्रत्यक्ष

त्यांनी लिहिलेल्या कथेतून दलितांच्या इतिहासाची ओळख व त्यातून दलितांच्यात स्वाभिमान जागृती करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे."६(संपादक,आसाराम गायकवाड,लो.तथा लोकलेखक अण्णाभाऊ साठे, झेप प्रकाशन नाशिक ऑगस्ट-१९९६ स्वतः लेख पृ.क्र.२७६ ) म्हणूनच असे म्हणावे लागते दलितांचा इतिहास शब्दात बांधणारे अण्णाभाऊ साठे एकमेव कथाकार आहेत.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 'सावळा मांग' या कथेत सांगितलेले 'शील':-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 'सावळा मांग' या कथेत सांगितलेल्या 'शील' या विषयीचे उत्तम उदाहरण म्हणून सांगता यईल "दादा पाटलान काखेतील गाठोड खाली ठेऊन हात जोडले म्हणाला 'सावळा, तुझं नाव एकून हाय तुझा बोलबाला मला ठाव हाय. हे दागिन घे. पण सावळा, माझ्या लेकीच्या अंगाला हात लावू नक मी मी अब्रूदार हाय.मी लेकीच्या अब्रूसाठी हजार दोन हजार रुपये दिन पोरीला हात... आणि सावळाची जोरदार चपराक दादा पाटलाच्या तोंडात कडाडली. तसा तो कोलमडून खाली पडला काशीबाई किंचाळली सावळा कुऱ्हाड उगारून गरजला. 'उठून उभा ऱ्हा' आता मारू नक दादा पाटील गाल चोळीत उठला नी सावळा म्हणाला मारू नक का? तुला ठारच मारायला पायजे दौलतीचा धनी म्हणून लेकीच्या अब्रूचा लिलाव मांडलास. तूच तेवढा अब्रूदार आणि आम्ही अब्रू सोडलीया अस तुला कोणी सांगितल बिल? मध्यरात्री झाली होती. सावळा येण्याची वेळ टळून गेल्यामुळे फकीरा,मुरा,बळी,निळू हे घोड्यावर खोगीर घालून नि कमरेला तलवारी बांधून तयार झाले होते.

टाळगाव जाळून फत्त करण्याचा सर्व मांगांनी निर्धार केला होता. पण सावळा येताच सर्व शांत झाले आणि सर्वांना उद्देशून सावळा म्हणाला,ऐका मर्दानू,आम्ही इंग्रजांविरुद्ध बंडावा केला खरा.पण आमच्या वैऱ्यांनी आमच्याविरुद्ध रान उठवलय.आम्ही लुटालूट करतो, लोकाच्या पोरी त्यांची अब्रू घेतो असा आमचा बदलौकिक झालाय तवा असा बदलौकिक झालेल्या माणसांनी तलवार पेलण्याचा हक नाय तरवार हि नेक कामासाठीच उगारली पाहिजे.नि मारली पाहिजे, 'नाना तू करशील ते आमास्नी कबुल हाय' फकीरा म्हणाला 'आमचा लौकिक वाढविण्यासाठी पाच नव्हे तर पाचशे मांग कठून मेला तरी मांग बघणार न्हाय.बंडवाला मांग माणूसच हाय हे साऱ्या अलम दुनियेला कळू दे मांगाच बंड वाढत होत. फकीरा,मुरा,बळी,निळू,हे आमच्या लौकिकासाठी झटत होते.आणि सावळा लौकिक वाढवण्यासाठी जीवाचं रान करीत होता.तो बेईमानांचा काळ झाला होता.जे जावई बायकांना नीट वागवीत नव्हते त्यांना त्यांना धारेवर धरले होते.

काशीच नांदण लागल्यामुळे त्या खोऱ्यात एक नवे पर्व सुरु झाले होते.गावोगावचे लेकींचे बाप येऊन सावळाला भेटत होते. नि जावयांच्या कुकर्मांचा पाढा वाचत होते. मग सावळा त्या गावाला जाऊन त्या त्या जावयाची रग चीरवीत कित्येक मुलींचे संसार सोन्याचे झाले होते. नि अनेक लेकी

सावळाला दुवा देत होत्या.अण्णाभाऊंनी केलेले स्त्रियांचे चित्रण उदात्त असे आहे, व ते भारतीय विचाराच्या दृष्टीकोनाशी सुसंगत आहे.त्यांच्या साहित्याकृतीतील स्त्रियांच्या जवळजवळ सर्वच व्यक्तीरेखा आपले शील जपण्यासाठी संघर्ष करीत असताना दिसतात.शिलभ्रष्ट होण्यापेक्षा मरण परवडले असा त्यांचा दृष्टीकोन असतो.स्त्रियांचे वर्णन अण्णाभाऊंनी सभ्यतेच्या मर्यादा पाळून करतात.ते कधीही कामुकतेकडे झुकत नाहीत."७ (तत्रैव पृष्ठ क्र.१७४)

अण्णाभाऊंच्या जडणघडण काळातील मानवाच्या विशाल जाणीवेचा तो नवा धर्म होता. या बरोबर दलित पतितांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क व अण्णाभाऊंना कलावंत म्हणून निर्मिती करण्यात प्रेरणा त्यांना आंबेडकरी जाणीवच अधिक श्रेयस्कर ठरली.या संदर्भात प्र.ओ.थोरात एके ठिकाणी लिहीतात,अण्णाभाऊंच्या जीवनदृष्टीचा विचार हा दलित जाणीवेचा आहे. दलितांना सामाजिक,आर्थिक,सामाजिक न्याय मिळावा,यासाठीच श्रमविश्वास प्रकट झालेला आहे. आंबेडकरी चळवळीचे पडसाद अधिक प्रमाणात आढळतात.चळवळीचे प्रतिबिंब,अस्पृश्य समाजातील महार,मांग,चांभार यांच्या मनाची पालटणारी मनोवृत्ती यांच्या ठिकाणी जागा झालेला स्वाभिमान, अस्थिरतेने भरलेले मन,बदलणारे भावविश्व बुद्धाच्या शिकवणीतील नैतिक मूल्यांचे शहाणपण असे अनेक गडद रंगाचे त्यांच्या नायक नायिकेच्या जीवन पैलूतून भेटते आणि नायकाच्या मनात संघर्षाचे बीज पेरत पेरत जगण्यासाठी संघर्षांचे बळ पायात ओतते हाच अण्णाभाऊंच्या कथाविश्वाचा प्रचंड विजय होय.हीच आंबेडकरी चळवळीतील जीवन जाणीवेच्या गाभ्यातील शिल्पकला अण्णाभाऊंच्या कथाविश्वात ओतप्रेत भरलेली दिसते आहे. थोरात यांच्या मताप्रमाणे अण्णाभाऊंच्या कथाविश्वात मार्क्सवादाबरोबरच सामाजिक,आर्थिक,सांस्कृतिक,ऐतिहासिक, अशी चौफेर लढणारी व दलितांना न्याय मिळवून देणारी अशी आंबेडकरी जाणीवच प्रामुख्याने आढळते हे ही लक्षात घ्यावे लागेल.

अण्णाभाऊंनी त्यांच्या "फकिरा ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंजार लेखणीस अर्पण केली आहे. फकिरा हा एक झुंजार वीरनायक आहे मांग जातीत उपेक्षा घेऊन जन्माला आलेला फकिरा आपल्या जमातीच्या मुक्ततेसाठी सामाजिक व्यवस्था व पारतंत्र्यातील राजकीय व्यवस्थेसाठी अखेरपर्यंत लढत राहिला. अखेरीस आत्मार्पण केले तेदेखील आपल्या जमातीच्या बंधमुक्तीसाठी पराक्रम, वीरवृत्ती, माणुसकी, दिलदारपणा आणि जिद्दी, धाडसीपणा, त्यांच्या ठायी बालपणापासून आहे.या गुणीपणाचे उदात्तवृतीने अण्णाभाऊंनी चित्रण केले आहे. दलितांना-उपेक्षितांना दास्यमुक्तींचा संदेश डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिला. सामाजिक समतेसाठी सतत संघार्षरत राहत दलितांना माणूस म्हणून जगण्याची प्रेरणा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व/बंधुता या जीवनमुल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर अविरत प्रयत्न करीत राहिले. मानवमुक्तीचा जाहीरनामा त्यांनी मांडला. अशा प्रेरक व्यक्तिमत्वाच्या आदरपूर्वक पूजेसाठी फकिराची झुंजारकथा

बाबासाहेबांना अर्पण करून त्यांचा वारसा पुढे चालवण्याचा पाठ त्यांनी घालून दिला."८(तत्रैव पृष्ठ क्र.१७६) "मानवाला त्यांच्या बाह्यजीवनाच्या परिस्थितीतून वरच्या पातळीवर नेण्याचा प्रयत्न करणे त्याला कमीपणा आणणाऱ्या वास्तव जगाच्या बंधनातून मुक्त करणे आणि तू गुलाम नाहीस,तू वास्तव जगाचा धनी आहेस,तू जगाचा स्वतंत्र निर्माता आहेस.असा साक्षात्कार करून देणे हे वाङ:मयाचे खरे वैशिष्टे आहे. या अर्थाने वाङ:मय सदैव क्रांतिकारक असते.म्हणूनही वरील अर्थाने परिपूर्ण असे साहित्य निर्माण करू या आणि आपल्या लेखण्या दलितांच्या चरणी अर्पूया" ९ (तत्रैव पृष्ठ क्र.१७६) या त्यांच्या म्हणीप्रमाणे डोळसपणे आंबेडकरी धागा दिसतो.अनुभूतीला सहानुभूतीची जोड आणि निरीक्षणाला वेदनेचा ठाव घेण्याचे भान नसेल तर खरी प्रतिज्ञा सुध्दा अंधारातल्या आरशासारखी दगा देते, असा अण्णाभाऊचा अनुभव होता.

**निष्कार्षांती :-**

अण्णाभाऊंनी या देशात अशा एका काळात जन्माला आले. जेव्हा एक नवे जग आकारात येऊ घातले होते टिळकयुगाचा अस्त होऊन गांधी युग सुरु झाले होते आणि या युगाला समांतर म्हणता येईल अशा डॉ.बाबसाहेब आंबेडकरी युगाचा ही प्रारंभ झाला होता.एका बलाढ्य परकीय राजवटीस गांधीजी अहिंसेच्या मार्गाने झुंज देत होते, तर हजारो वर्ष जातीपातीच्या नावाखाली मूक व बहिष्कृत जनतेवर लादल्या गेलेल्या सांस्कृतिक, धार्मिक, साम्राज्यवादीविरुध्द डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लढा उभारत होते.सामाजिक न्यायाची मागणी प्रस्थापितांकडे करत होते. लढाऊ साम्राज्यवाद ही भारतात रुजू झाला होता. तेंव्हा खऱ्या समस्यांची सर्व अर्थाने सोडवणूक करून येथील दु:खी माणसाची जीवघेण्या असस्थेमधून मुक्तता करावयाची असेल, व त्यांना सुखी जीवन जगावयाचे असेल तर हे जग बदलायला हवे ते बदलण्यासाठी त्यावर घाव घालावा लागेल,मग तो घाव विचाराचा असेल, कृतीचा असेल, आणि सर्व बदलण्याची ताकत फक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारात होती हे अण्णाभाऊंनी जाणले होते.

बांधवानो तुम्ही प्रत्येक बहुजन व दलित माणसांने असा फकिरा झाला पाहिजे उपेक्षित मांग जातीत जन्माला आलेला फकिरा आपल्या बांधवांच्या मुक्ततेसाठी येथील समाज व्यवस्थेशी व पारतंत्र्यातील राजकीय व्यवस्थे विरुध्द अखेरपर्यंत लढत राहिला व अखेरीस समर्पण केले ते देखील आपल्या मांग जातीच्या बंधमुक्ततेसाठी फकिरा हा पराक्रम,वीरवृत्ती,मर्दानगी व जातीसाठी,आपल्या मातीसाठी प्राणार्पण करणारे धगधगते क्रांतिकारी आंदोलन होते माझ्या ठायी आदर असेल तर माझ्या क्रांतीचे नायक व्हा असे म्हणणाऱ्या सर्वच थोर समाज सुधारकांच्याप्रती विनम्रपणे अभिवादन करून माझ्या लेखणीस विराम देतो.

..... जय भीम, जय लहूजी .....

संदर्भसूची:

१. अण्णाभाऊ साठे२०१६-ऑगस्ट,मुंबई,विनिमय प्रकाशन,कृष्णाकाठच्या कथा ,
२. संपादक आसाराम गायकवाडझेप,तथा लोकलेखक अण्णाभाऊ साठे.लो- प्रकाशन नाशिक-ऑगस्ट, .१९९६
३. डॉपुणे,भारतीय विचार साधना,मय:अण्णाभाऊ साठे व्यक्ती आणि वाड ,अंबादास सगट.
४. डॉ– अरुणा प्रकाशन लातूर,मातंग समाजाचा इतिहास,सोमनाथ कदम.नोव्हेंबर २०१५.
५. मन्छिद्र सकटे.अण्णाभाऊ साठे एक सत्यशोधक ,
६. डॉसंपा,कृष्णा आग,अमोल महापुरे,मनीषा पाटील.दक मंडळ : सत्यशोधक अण्णाभाऊ साठे-२०१८-ऑक्टोंबर-लातूर,शौर्य प्रकाशन ,बहुजनांचे कैवारी